# जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन शाखा)

scy.ahmednagar@gmail.com (टोल फ्री क्र.1077) दुरध्वनी क्र. 0241-2343600

**विषय - कोरोना विषाणू (कोविड -19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपयायोजना करण्याबाबत.**

**वाचावे** -1. आपत्ती व्यावस्थापन कायदा, 2005.

2. साथ रोग अधिनियम, 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडील अधिसूचना कोरोना 2020/प्र.क्र.58/आरोग्य 5 , दि.14/03/2020.
4. महसूल व वन विभाग यांचेकडील आदेश क्र. डीएमयु/2020/सीआर 92/ डीएसएम 1 दि.23/03/2020, 17/05/2020, 19/05/2020, 31/05/2020, 29/06/2020
5. या कार्यालयाकडील आदेश क्र.आव्यमपु /कार्या 19 अ/513 दिनांक 21/05/2020
6. सचिव, केंद्रीय आरोग्य व कुटुंब मंत्रालय यांचेकडील अ.शा.पत्र दिनांक 01/07/2020

क्र. आव्यमपु/कार्या 19अ/771 /2020 **आदेश** अहमदनगर दि. 05/07/2020

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोविड -19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3,4 मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हीड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणुन घोषीत करण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 5 अन्वये अहमदनगर जिल्हयातील खाजगी रुग्णालय/ प्रयोगशाळा (लॅब) यांना कोविड -19 च्या अनुषंगाने नमुने तपासणी प्रयोगशाळेत पाठविणेकामी व नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आलेल्या रुग्णांचे / व्यक्तींचे तपासणी अहवाल प्राप्त होईपावेतो संस्थात्मक विलगीकरण (Institutional quarantine) करणेबाबत निर्देश देणेत आलेले आहेत.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 6 अन्वये कोविड -19 चे अनुषंगाने, प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा भाग म्हणून कोविड -19 चाचणी प्रयोगशाळांमध्ये जलदगतीने चाचणी व प्रयोगशाळांचा पूर्ण क्षमतेने वापर केल्यास बाधित रुग्णांवर तातडीने उपचार करता येतील. त्यास्तव, कोविड -19 चाचणी प्रयोगशाळा व वैदयकीय व्यावसायिकांसाठी सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

त्याअर्थी, मी, जिल्हाधिकारी, अहमदनगर साथ रोग अधिनियम 1897 अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना व नियमावलीमधील तरतुदीनुसार कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने मला प्राप्त अधिकारानुसार **खाजगी रुग्णालये / प्रयोगशाळा (लॅब) यांना कोविड -19 च्या अनुषंगाने नमुणे तपासणीसाठी प्रयोगशाळेस पाठविणेकामी खालील प्रमाणे सुचनांची अंमलबजावणी करण्याबाबत आदेशीत करीत आहे.**

- ICMR मान्यता प्राप्त खाजगी प्रयोगशाळेत कोविड -19 तपासणीसाठी डॉक्टरांच्या Prescription ची आवश्यकता असणार नाही.
- संबंधित प्रयोगशाळांना स्वॅब घेतलेल्या व्यक्तींची माहिती तसेच कोविड -19 पॉझिटीव्ह रुग्णांची माहिती व अहवाल जिल्हा शल्य चिकीत्सक, अहमदनगर व जिल्हा सर्वेक्षण अधिकारी, अहमदनगर यांना दररोज कळविणे बंधनकारक आहे. (idspanagar@gmail.com) तसेच संबंधीत माहिती RTPCR app वर टाकणे बंधनकारक राहील.

- खाजगी वैदयकीय व्यावसायिकांना कोविड-19 लक्षणे असणा-या व्यक्तींची तपासणी करावयाची असल्यास स्वॅब घेतल्यानंतर रुग्णालयात भरती करणे आवश्यक राहील.
- लक्षणे नसणा-या व्यक्ती / कोविड -19 पॉझिटीव्ह सहवासीत व्यक्ती/ शस्त्रक्रिया पूर्व खाजगी प्रयोगशाळेत कोविड-19 तपासणी करावयाची असल्यास संबंधीतांना स्वॅब घेतल्यानंतर रुग्णालयात भरती करण्याची आवश्यकता असणार नाही तथापि, सदर व्यक्ती यांना अहवाल प्राप्त होईपर्यंत Home quarantine राहणे आवश्यक राहील. संबंधीत खाजगी प्रयोगशाळांनी Home quarantine शिक्का त्यांचे हातावर मारणे बंधनकारक राहील.
- कोविड-19 अहवाल पॉझिटीव्ह आलेल्या रुग्णांची माहिती तातडीने निकटचे शासकीय रुग्णालयांना कळविणे तसेच त्यांना शासकीय Isolation Institute मध्ये भरती होणे बंधनकारक राहील.

कोणतीही व्यक्ती/संस्था/संघटना यांनी उक्त आदेशाचे उल्लंघन केल्यास ते भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) च्या कलम 188 नुसार दंडनीय / कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

(राहुल द्विवेदी)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहमदनगर**

प्रत - 1) जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी.
2) आयुक्त, महानगरपालीका, अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी.
3) जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांचेकडेस कार्यवाहीसाठी
4) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडेस कार्यवाहीसाठी
5) उपविभागीय दंडाधिकारी ------------- (सर्व) यांचेकडेस कार्यवाहीसाठी.
6) तहसिलदार तथा Incident Commander ---------------- (सर्व) यांचेकडेस कार्यवाहीसाठी.
7) मुख्याधिकारी नगरपालीका / नगरपंचायत ---------- (सर्व) यांचेकडेस कार्यवाहीसाठी.
8) जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर यांचेकडेस प्रसिध्दीसाठी.